लोकमत

पी-बुक विरुद्ध इ-बुक!

(29-04-2012 : 00:00:01)

- पराग पोतदार

मराठी साहित्यविश्‍व एका नव्या स्थित्यंतराच्या उंबरठय़ावर उभे आहे. पारंपरिक प्रकाशनविश्‍वाची चौकट विस्तारते आहे, तंत्रज्ञानाची कासही धरली जात आहे. त्या सार्‍यामधून अवघ्या मराठी साहित्यविश्‍वाला भुरळ घालते आहे ती एकच गोष्ट -‘इ-बुक्स.’ ‘पी-बुक’ (म्हणजे प्रिंटेड-छापील)कडून ‘इ-बुक’कडे इतका सरळ, साधा प्रवास होणे नाही. हे स्थित्यंतर वरकरणी साधे सोपे आणि सहज वाटत असले, तरीही या स्थित्यंतराला संघर्षाची किनारही आहे.

गेल्या काही दिवसांपासून मराठी साहित्यविश्‍वात याच संदर्भातील एक वाद पेटतो आहे. तो म्हणजे, पी-बुक विरुद्ध इ-बुकचा! महाराष्ट्राचे लाडके लेखक पु. ल. देशपांडे यांची पुस्तके इ-बुक स्वरूपात आणल्याने पडलेली वादाची ठिणगी आता तात्यासाहेबांच्या अर्थात कुसुमाग्रजांच्या इ-बुक साहित्यनिर्मितीमुळे चांगलीच पेटली आहे. इ-बुक्सचे हक्क नक्की कोणाकडे, हा खरा वादाचा विषय आहे.

‘बुकगंगा डॉट कॉम’ या इ-बुक निर्मिती करणार्‍या कंपनीने कुसुमाग्रज प्रतिष्ठानशी संपर्क साधून त्यांच्या परवानगीने कुसुमाग्रजांचे सारे साहित्यविश्‍व इ-बुक स्वरूपात सादर केले आणि या पुस्तकांचे मूळ प्रकाशक जागे झाले. कॉन्टीनेंटल, पॉप्युलर प्रकाशन आणि ज्योत्स्ना प्रकाशन यांनी कुसुमाग्रजांची बहुतांश पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. त्यामुळे त्यांनी या पुस्तकांवर आमचा कॉपीराईट असल्याने ही पुस्तके आमच्या परवानगीशिवाय इ-बुक स्वरूपात आणता येणार नाही, असा दावा केला. कुसुमाग्रजांनी इ-बुक अधिकारासंदर्भात मृत्युपत्रात कोठेही उल्लेख केलेला नसल्याने प्रकाशकांचा कॉपीराईट हा त्यांच्या छापील पुस्तकापुरताच र्मयादित आहे त्यामुळे प्रतिष्ठानची परवानगी इ-बुकसाठी पुरेशी आहे, असा पवित्रा बुकगंगाने घेतला. इथून वादाला खर्‍या अर्थाने तोंड फुटले आहे.

आता हा विषय केवळ पुल अगर कुसुमाग्रजांच्या साहित्यसंपदेपुरता र्मयादित राहिलेला नसून इ-बुक प्रकाशित करण्याच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

आज जी पुस्तके मोठा गाजावाजा होऊन इ-बुकच्या स्वरूपात आणली जात आहेत ती अगोदर पी-बुक अर्थात छापील पुस्तके होती. या छापील पानांचे ‘स्कॅनिंग’ करून त्याची पीडीएफ फाइलच इ-बुक स्वरूपात आणली जात असल्यामुळे त्याचे अधिकार नक्की कोणाकडे, हा खरा कळीचा मुद्दा आणि सार्‍या वादाचे मूळ आहे. अनेक लेखकांनी पूर्वी प्रकाशकांशी करार केले होते किंवा मृत्युपत्रात प्रकाशकांना व ट्रस्टला आपल्या साहित्यकृतींचे अधिकार दिले होते. त्यावेळी इ-बुक हा प्रकारच अस्तित्वात नव्हता. त्यामुळे त्यांच्या करारपत्रात इ-बुकचे अधिकार कुणाकडे असतील, याचे कुठलेही उल्लेख नाहीत. त्यामुळे त्याच आधारावर इ-बुक निर्मात्यांनी पुस्तके सादर करताना त्यासाठी प्रकाशकांच्या परवानगीची गरज नाही. संबंधित लेखक अथवा त्याच्याशी संबंधित ट्रस्ट, प्रतिष्ठान यांची परवानगी पुरेशी आहे, अशी भूमिका घेतलेली आहे. अर्थातच प्रकाशक वर्गाचा या भूमिकेला ठाम विरोध आहे.

जागतिक स्तरावर इ-बुक्सची वाटचाल आहे अवघी दहा-बारा वर्षांची; परंतु इतक्या कमी काळात इ-बुक्सनी परदेशांत जी प्रगती केली आहे ती थक्क करणारी आहे. २000 मध्ये स्टिफन किंग्जचे ‘रायडिंग द बुलेट’ हे पहिले पुस्तक बाजारात आले आणि अक्षरश: त्यावर लाखोंच्या उड्या पडल्या. त्याचा झपाट्याने प्रसार झाला. मराठी वाचक या इ-पुस्तकांना फारसा सरावला नसला, तरी लेखकांना मात्र एक नवा मार्ग भुरळ घालू लागला आहे. त्यामुळे अनेक लेखकांनी उत्साहाने इ-बुकसाठी उड्या मारल्या खर्‍या; परंतु त्या प्रमाणात पुस्तकांची ऑनलाइन विक्री होत नसल्याचे दिसून आले. त्यातून नव्याच भ्रमनिरासाला सामोरे जावे लागले. हे जरी असले तरीही तंत्रज्ञानाचा प्रसार रोखता येणार नाही. आज ना उद्या, येणार्‍या पिढीत इ-बुकचे आज धूसर वाटणारे चित्र स्पष्ट झालेले असेल व त्यांच्यामध्ये त्याचा उत्तम प्रसार झालेला असेल. त्यामुळे काही प्रकाशकांनी दूरदृष्टी ठेवून चांगल्या लेखकांच्या पुस्तकांची इ-बुक स्वत:च तयार करण्याचे काम

हाती घेतले आहे. त्यासाठी सॉफ्टवेअर आणि तंत्रज्ञानाचीही जुळवाजुळव सुरू केली आहे.
या आधी प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या इ-बुकचे अधिकार कुणाकडे हा अद्याप अनुत्तरितच प्रश्न आहे. खुद्द लेखकांच्या मनात त्याविषयी मोठा संभ्रम आहे. प्रकाशकांनीही या विषयाकडे जितक्या गांभीर्याने पाहिले पाहिजे तितकी सजगता अजून तरी दिसून येत नाही. या साऱ्यांतून नवेच जटील प्रश्न निर्माण होणार आहेत. अवघ्या जगभरातील साहित्यविश्वाला भेडसावणाऱ्या पायरसीचे आव्हान भविष्यात रोखणार कसे? इ-बुक वाचण्याचे सॉफ्टवेअर आणणार कसे? खरोखर इ-बुक वाचण्याचा अनुभव मिळवणार की फक्त संगणकावर छापील स्कॅन केलेली पानेच वाचण्यात धन्यता मानणार, हे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत. मराठी साहित्यविश्व खरोखरीच एका स्थित्यंतराच्या उंबरठय़ावर उभे आहे.

आयत्या बिळावर.
मुळातच आपल्याकडील अनेक जणांना इ-बुक म्हणजे काय, हेच उमगलेले नाही. आपल्याकडे जे इ-बुक म्हणून दाखवले जाते त्याची पाने छापील पुस्तकांच्या प्रतिकृतीसारखीच असतात. त्यामुळे अशा कॉपीबहाद्दर इ-बुक प्रकाशकांची भूमिका केवळ विक्रेत्यांचीच आहे. खऱ्या इ-बुकमध्ये शब्दावर बोट ठेवताक्षणी त्याचा अर्थ आपल्याला कळतो. सक्षम डिक्शनरी हे त्याचे मोठे पाठबळ असते. दोन ओळींमधील अंतर कमी-जास्त करणे, फाँटचा आकार कमी-जास्त करणे या सुविधा त्यामध्ये उपलब्ध असतात.
संहितेचे हक्क लेखकाकडे असतात हे मान्य; पण त्यासाठी लेखकाबरोबर केलेली चर्चा संहितेचे संपादन पुस्तकात वापरलेली सर्मपक चित्रे, त्यासाठी साकारलेले मुखपृष्ठ, त्याची मांडणी यासाठी प्रकाशकांनी मोठी गुंतवणूक केलेली असते. यातील कोणतीही प्रक्रिया न करता, पुस्तकावर संस्कार न करता लेखकांना ६० टक्के रॉयल्टीचे आमिष दाखवून लोकांची दिशाभूल केली जात आहे. जगभरात छापील पुस्तकांसाठी लेखकांना साडेसात ते १२ टक्के रॉयल्टी दिली जाते. तर इ-बुकसाठी लेखकांना २० ते २५ टक्के रॉयल्टी मिळते. परंतु इथे वाढीव रॉयल्टीचे आमिष दाखवून प्रकाशक व लेखकांमध्ये गैरसमज पसरवले जात आहेत. त्याहीपेक्षा आमचे हक्क बेकायदेशीररीत्या वापरले जात आहेत.
प्रकाशकांमधील काही मोजक्या चुकीच्या प्रकारांकडे बोट दाखवून लेखकांची दिशाभूल करणेही योग्य नाही. ‘आयत्या बिळावर नागोबा’ असाच हा प्रकार
आहे. त्यामुळेच या अशा प्रकारांच्या विरोधात प्रकाशकांनी एकत्र येऊन विरोध करायचे ठरवले आहे. खऱ्या अर्थाने इ-बुक तयार करण्यासाठीही पावले उचलली आहेत.
- मिलिंद परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन

तोडगा निघेल!
कुठलीही साहित्यकृती लेखक जेव्हा साकारतो, तेव्हा त्याचे मूळ हक्क त्याच्याकडेच असतात. ती वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रकाशक हा माध्यम असतो. त्यामुळे त्या पुस्तकाच्या आवृत्तीपुरत्या वितरणाचे हक्क त्या प्रकाशकाला असतात इतकेच. परंतु त्यातील आशय हा लेखकाचाच असतो. पूर्वीदेखील जर प्रकाशकांनी योग्य रीतीने वितरण केले नाही, तर लेखकांनी प्रकाशक बदलल्याची अनेक उदाहरणे आहेत. प्रकाशकांकडेच सर्व हक्क असतात, हा समज मुळातच चुकीचा आहे.
सध्याच्या काळात जी इ-बुक्स, ऑडिओ बुक्स तयार होत आहेत, त्यामध्ये पुन्हा या नव्या माध्यमांमध्ये कॉपीराईटच्या हक्कांचे संदर्भ बदलते असणार आहेत. एखादा चित्रपट साकारताना दिग्दर्शक हा संबंधित लेखकाचीच परवानगी घेत असतो. त्यात प्रकाशकांचा संबंध अगदी अभावानेच असतो.
इ-बुक हे छोट्या खेड्यापाड्यांपासून सर्वदूर पोहोचू शकेल, असे माध्यम आहे. छपाईखर्च नसल्याने लेखकांना जिथे विक्रीच्या १० ते १५ टक्केमानधन प्रकाशक द्यायचे तिथे मी ६० टक्केरॉयल्टी देतो. तंत्रज्ञानामुळे लेखक-प्रकाशक या संबंधात पारदर्शकता आली आहे. त्यामुळेच प्रकाशकांनाही भविष्यात इ-बुकचा स्वीकार करावाच लागणार आहे.

प्रकाशकांनी त्यासाठी पुढे येऊन वाचकांना ती उपलब्ध करून दिली पाहिजेत.

एकमेकांच्या पायात पाय घालण्याऐवजी नकारात्मक विचार बाजूला सारून साऱ्यांनी एकत्र येऊन या विषयात तोडगा काढणे गरजेचे आहे.

- मंदार जोगळेकर,

संचालक बुकगंगा डॉट कॉम

meghanadhoke@lokmat.com